● शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श


संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खासदार डॉ. काळे आक्रमक

### केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांना दिले निवेदन

**नवी दिल्ली -** महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांचा कापूस अजूनही घरात पडून आहे, कारण भारतीय कापूस महामंडळ (CCI) कडून खरेदी केंद्रे अनियमितरित्या चालवली जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात कापूस विकावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांची भेट घेऊन तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे. खासदार काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांकडून अजूनही ५०% पेक्षा अधिक कापूस विकला गेलेला नाही, आणि अशा परिस्थितीत उउख ची खरेदी केंद्रे बंद करणे हे अन्यायकारक आहे. केंद्र सरकारने कापूस खरेदी प्रक्रिया अखेरच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत सुरू ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



**शेतकऱ्यांचे मोठे नुकसान**

सध्या खाजगी व्यापारी CCI पेक्षा कमी दर देऊन शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सरकारी हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

**सरकारकडून त्वरित निर्णयाची अपेक्षा**

या संदर्भात केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी या मुद्द्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी CCI ची खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचा आणि व्यापाऱ्यांच्या मनमानीला आळा घालण्याचा विचार केंद्र सरकार करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि त्यांच्या कापसाला न्याय मिळावा, यासाठी खासदार काळे यांचे प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## शिवजन्मोत्सवा निमित्त रंगणार कुस्त्यांची दंगल!

### मराठा क्रांती मोर्चा समिती कार्यालयाचे थाटात उद्घाटन




**जालना । प्रतिनिधी -** विश्ववंदनीय, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा क्रांती मोर्चा तर्फे राज्य स्तरावरील कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आली असून महाराष्ट्रातील नामांकित मल्ल सहभागी होणार आहेत. अशी माहिती शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष करण राजे जाधव यांनी केली.

मराठा क्रांती मोर्चा प्रणित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवारी ( ता. ०७) गांधी चमन परिसरातील देवगिरी संकुलात राजेश राऊत, उद्योजक कैलास लोया, एकबाल पाशा यांच्या हस्ते थाटात करण्यात आले. यावेळी विष्णू पाचफुले, महावीर ढक्का, अश्विन अंबेकर, मराठा क्रांती मोर्चा शिवजन्मोत्सवाचे संस्थापक अरविंद देशमुख, जगन्नाथ काकडे, संजय देठे, किशोर गरदास, प्रशांत गाढे, सचिन कांबळे, अंकुश राजगिरे, विजय पवार, सुवर्णा राऊत- वाघ, मावळते अध्यक्ष अशोक पडूळ, डॉ. धनसिंह सुर्यवंशी, राजेंद्र जाधव,शेख इब्राहिम, महेंद्र मंचेवार, स्वप्नील हिवराळे, संतोष कऱ्हाळे, शक्ती राजपूत, समिती चे अध्यक्ष करण राजे जाधव, स्वागताध्यक्ष अ‍ॅड. आनंद झा, कार्याध्यक्ष सागर पाटील, सचिव अ‍ॅड. लक्ष्मण उढाण, किरण शिरसाठ, अंकुश पाचफुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना राजेश राऊत म्हणाले, सामाजिक आणि धार्मिक एकोप्याचा आदर्श जालना शहराने फार पूर्वीपासून जपला असून सर्व जाती-धर्मातील बांधव शिवजन्मोत्सवात सहभागी होतात असे त्यांनी सांगितले.

एकबाल पाशा यांनी मानवता धर्म जोपासना करणारे छत्रपती शिवरायांच्या जयंतीस मुस्लिम समाजाचा नेहमी पाठींबा राहिला आहे. यंदा ही मुस्लीम समाज उत्साहाने सहभागी होईल, असे त्यांनी सांगितले.

अरविंद देशमुख यांनी मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समितीची स्थापना, १८ पगड जातीला सोबत घेऊन सर्व जाती-धर्मातील समाजसेवकांना जयंतीचे अध्यक्षपद दिले असून यंदाही अध्यक्षांचे वैयक्तिक कार्य न मानता सर्व पदाधिकारी आणि शिवप्रेमींनी झटून कामास लागावे आणि उत्सव यशस्वी करावा असे आवाहन अरविंद देशमुख यांनी केले.

सुत्रसंचालन शुभम टेकाळे यांनी केले तर अशोक पडूळ यांनी आभार मानले. यावेळी उपाध्यक्ष आकाश जगताप, साई पाचफुले, सहसचिव गजानन काळे, योगेश सोळंके, बाळासाहेब देशमुख, कोषाध्यक्ष अ‍ॅड. सुनील काळे, प्रविण पाचफुले, योगेश पाटील, अ‍ॅड ए. डी. इंगळे, अ‍ॅड. धीरज धन्ने, आदित्य खंडागळे, रोहित जाधव, स्वप्निल मोताळे, कुणाल जाधव, अर्जुन बनसोडे, आनंद वानखेडे यांच्या सह शिवप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सवानिमित्त १८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भव्य कुस्ती स्पर्धेसाठी एक लाखांचे बक्षीस राजूरी स्टील तर्फे देण्यात येईल, अशी घोषणा संचालक इंजि. कैलास लोया यांनी उद्घाटन प्रसंगी बोलतांना केली.

## युवा आदर्श

### लाच तक्रार ...

**लाचखोरी न् तक्रारी**
**अगदी व्यस्त प्रमाण**
**बिनधास्त चाले गुन्हे**
**लाचखोर हो रममाण**
**तक्रारदार रे उदासीन**
**होत राहतात हैराण**
**काय करायचे आम्हां**
**कशाला फुकाचा त्राण**
**कशा कराव्या तक्रारी**
**कित्येक असे अजाण**
**भिंतीचे सावटा खाली**
**चिडीचूप बसे सुजाण**
**लाचखोरां पकडायचे**
**पुराव्यांनी ते सप्रमाण**
**कायद्याच्या जंजाळात**
**कोण जाणी परिमाण**
**उदासीन राहून आपण**
**अडचणी करे निर्माण**
**सुटून जातात गुन्हेगार**
**विचीत्र जन अंगुष्टाण**
**बदलायां हवी प्रवृत्ती**
**सज्ज शासन प्रतिष्ठान**
**मनामना हवी शलाका**
**जागरूकता अधिष्ठान**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मनपाची अनाधिकृत होर्डिंग्जविराधोत कारवाई; २७ जणांवर गुन्हे दाखल; ५० हजारांचा दंड वसुल

### विद्युत खांबावरील बॅनर अधिकृत आहेत का? कोचिंग क्लासेसवाले मनपाचे जावई आहेत का? सामान्यांना प्रश्न

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगर पालिकेच्यावतीने अनधिकृत होर्डिंग्ज विरोधात कारवाई करण्यात आली असून २७ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून ५० हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती मनपा प्रशासनाच्यावतीने देण्यात आली आहे.

जालना शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या होर्डिंग्जवर कारवाई व्हावी या संदर्भात दैनिक युवा आदर्शने वेळोवेळी वृत्त प्रकाशित केले आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पत्रकार परिषदेतही अनाधिकृत होर्डिंग्जबाबत युवा आदर्शच्या प्रतिनिधीने प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी पालकमंत्री मुंडे यांनी लक्ष घालणार असल्याचे सांगितले होते. मनपा प्रशासनाकडून मात्र, अमावस्या-पौर्णिमेला म्हणजेच महिना-दोन महिन्यानंतर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. काही जणांवर कारवाई करत दंड वसुल केल्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थै असते. शहरातील जवळपास सर्वच वीजेच्या खांबावर, दुभाजके नुकतेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील व छत्रपती संभाजीनगर उद्यान जवळील दादरा आदी विविध ठिकाणी होर्डिंग्ज-बॅनर झळकत आहेत. याकडे मात्र, मनपा प्रशासनाचे हितसंबंध जपत दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. की हे होर्डिंग्ज- बॅनर अधिकृत आहेत का? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.




शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या होर्डिंग्ज - बॅनर ह्या काही कोचिंग क्लासेस धारकांच्या आहेत. ऐवढ्या मोठ्या प्रमाणात अवघ्या शहर भरात या कोचिंग क्लासेसधारकांनी बॅनरबाजी करुन शहर विद्रुपिकरण केले आहे. यांच्यावर शहर मनपा प्रशासनाकडून कारवाई करण्यात येणार आहे का असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होतो आहे.

### जिल्हाधिकारी साहेब, कार्यालयात जाता येता तरी विद्युत खांबाकडे पहा...

जालना शहर विद्रुपिरकरणात भर पडत असून जागोजागी मोठ मोठाले होर्डिंग्ज लावण्यात आलेले आहेत. मनपा प्रशासनाकडून जवळपास २५० ते ३०० होर्डिंग व खाबांवरील क्युऑस्क बोर्डला एजन्सीधारकांमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र, त्यापेक्षा कितीतरी पटीत होर्डींग्ज व विद्युत खांबांवर होर्डिंग्ज- बॅनर झळकत आहेत. शहरातील रस्ते असो वा बायपास विद्युत खांबावर तर हमखास बॅनर दिसून येत आहे. विशेष म्हणजे हे रस्त्यावर आडवे लावण्यात आलेले आहे. जे की, धोकादायक आहे. अनेकदा मोठ्या गाड्यांचा धक्का लागण्याने हे बॅनर खाली रस्त्यावर पडतात. अनेक बॅनर फाटलेले आहे. यामुळे बॅनरला असलेल्या लोखंडी पाईपमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनपा प्रशासनाचे याकडे सर्रास दुर्लक्ष होत आहे. जिल्हाधिकारी साहेब आता आपणच कार्यालयात येतांना आणि जातांना थोडं गाडीच्या बाहेर डोकावून या विद्युत खांबांकडे पहावे.

### मनपाचे आर्थिक नुकसानीकडे दुर्लक्ष

जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने अधिकृतपणे काही एजन्सीधारकांना होर्डिंग्ज लावण्याकरीता जागा देण्यात आल्या आहेत. असे असले तरी शहरातील विविध भागात असलेल्या स्पॉट (जागा) साठी त्या एजन्सीधारकांकडून एकसारखाच दर लावण्यात आला आहे. मुळात हे एजन्सीधारक बस स्थानक, रेल्वे स्टेशन, सिंधी बाजार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, भोकरदन नाका, अंबड चौफुली, मंठा चौफुली, सिंदखेड राजा चौफुली, काळे चौक अशा विविध ठिकाणी असलेल्या होर्डिंग्जसाठी नागरिकांना विविध दर आकारतात. मनपा प्रशासनानेही बाजारमुल्यांचा विचार करुनच दर आकारणी करावी जेणेकरुन मनपाला आर्थिक हातभार लागण्यास मदत होईल.





कल्याण घोगरे स्टेडियम येथे जालना शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबिर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित योग प्राणायाम शिबिराचा समारोप शुक्रवार (दि ७) रोजी माजी मंत्री राजेश टोपे, शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी योग शिक्षक प्रल्हाद माऊली हरबक, राजेश राऊत, प्रियंका राजपूत, नंदा गायकवाड, सुप्रिया चव्हाण, अर्पणा जाधव, विजय फुलंब्रीकर, राहुल देशमुख, पंडित पवार, अशोक कटारे, संजय भालेराव, मोहन जामदार, बंडू चव्हाण, अजय व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. (छायाचित्र किरण खानापुरे)

# संपादकीय

## क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला

ज्यांचे क्रीडा विषयक लेख वाचत मी लहानाचा मोठा झालो. ज्यांच्या लेखाने माझे क्रिकेट विश्वातील ज्ञान वृद्धिंगत झाले. ज्यांच्या लेखणीतून प्रेरणा घेऊन मी क्रीडा विषयक लेख लिहू लागलो असे ज्येष्ठ क्रीडा समीक्षक, लेखक, स्तंभलेखक द्वारकानाथ संझगिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी गुरुवारी ( ६ फेब्रुवारी ) रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते त्या संदर्भात त्यांनी एक फेसबुक पोस्ट देखील लिहिली होती मात्र ते असे इतक्या लवकर जातील असे वाटले नव्हते. शालेय जीवनात असतानाच द्वारकानाथ संझगिरी हे नाव तोंडपाठ झाले होते. भारतीय संघाचा क्रिकेट सामना असला की त्या दिवशी सकाळी आणि क्रिकेट सामना संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सामन्यावर विश्लेषण करणारे वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचणे हा माझा आवडता उद्योग. त्यांचे क्रिकेट वरील ज्ञान तर अफलातूनच होते. सध्याच्या क्रिकेटवर भाष्य करतानाच ते आपल्याला भूतकाळात घेऊन जात अगदी पन्नास वर्षांपूर्वीच्या सामन्याचा किंवा खेळाडूंचा संदर्भ त्यांच्या लेखात असे. त्यांचा इतके क्रिकेटचे ज्ञान असलेले लेखक विरळच. केवळ वर्तमानपत्रातच नाही तर दूरचित्रवाणीवर देखील ते क्रिकेटचे समीक्षण करत. जवळपास पाच दशके क्रिकेटवर लेखन करून क्रिकेटप्रेम ींना नवी दृष्टी देणाऱ्या द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईतील दादर येथे झाला. मुंबईत शालेय शिक्षण घेतल्यावर त्यांनी माटुंग्याच्या व्हिक्टोरिया ज्युबली कॉलेजमधून इंजिनीरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इंजीअरिंग केल्यावर त्यांनी मुंबई महपालिकेत अभियंता म्हणून नोकरीही केली पण क्रिकेट व साहित्यातील रूचीमुळे त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला. क्रिकेटवर त्यांनी केलेले लेखन विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या लिखाणाला क्रिकेटप्रेमींनी नेहमीच पसंतीची दाद दिली. केवळ मराठीच नाही तर इंग्रजी आणि हिंदी दैनिकातून आणि साप्ताहिकातूनही ते लिहू लागले. त्यांनी अनेक क्रीडापटुंच्या मुलाखती घेतल्या. क्रीडापटुंची मुलाखत घेण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. ते क्रीडापटुंची मुलाखत घेत आहेत असे वाटतच नव्हते त्यांची मुलखात म्हणजे गप्पांचा कार्यक्रमच वाटत असे इतके मनमोकळेपणे क्रीडापटू त्यांच्यापुढे व्यक्त होत. केवळ क्रिकेट किंवा क्रीडाविषयकच नव्हे तर चित्रपट, प्रवास, पर्यटन आणि सामाजिक विषयांवर देखील त्यांनी विपुल लेखन केले . द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून २०११ पर्यंत झालेल्या सर्व क्रिकेटच्या विश्वचषकांचे त्या देशात जाऊन वार्तांकन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेटर्स आणि चित्रपट तारे तारकांवर अनेक कार्यक्रम केले. त्या कार्यक्रम ाच्या निवेदनाची धुरा तेच सांभाळीत. द्वारकानाथ संझगिरी यांनी जवळपास ५० पुस्तके लिहिली. त्यातील शतकात एकच सचिन, चिरंजीव सचिन, दिलखुलास बातचीत क्रिकेटपटूंशी, खेलंदाजी, बोलंदाजी, चॅम्पियन्स, चित्तवेधक विश्वचषक २०२३, क्रिकेट कॉकटेल, क्रिकेट वर्ल्डकप हाय लाईट, कथा विश्वचषकाच्या, लंडन ऑलिम्पिक, पॉवर प्ले, स्टंप व्हिजन, संवाद लिजेंडशी, क्रिकेट गाथा, थर्ड अंपायर, इंग्लिश ब्रेकफास्ट ही त्यांची पुस्तके क्रीडाप्रेमींना खूप आवडली. द्वारकानाथ संझगिरी यांना अनेक पुरस्कार मिळाले त्यात दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखक पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार, क्रीडाविषयक लेखनासाठी विश्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या निधनाने क्रीडाविश्वासह साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे विविधांगी लेखन कायम स्मरणात राहील. स्तंभलेखक, समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# १६ वे शब्दगंध साहित्य संमेलन; संमेलनाध्यक्षीय भाषण

संजीवनी तडेगावकर

अहिल्यानगर येथे होत असलेल्या १६ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटक पद्मश्री मा. पोपटराव पवार, स्वागताध्यक्ष मा. श्री. संपतजी बारस्कर, या संमेलनाचे पूर्वाध्यक्ष मा. डॉ. पुरुषोत्तमजी भापकर, प्रमुख उपस्थितीत असणारे मा. आमदार संग्रामजी जगताप, मा. शिवाजी चव्हाण, डॉ. सागर बोरूडे, संमेलन जीवापाड जपणारे आणि निष्ठेने आयोजित करणारे 'शब्दगंध' साहित्य परिषदेचे संस्थापक मा. सुनील गोसावी व शर्मिलाताई, 'शब्दगंध'चे अध्यक्ष मा. राजेंद्र उदागे, भगवान राऊत, ज्ञानदेव पांडुळे, डॉ. अशोक कानडे, डॉ. जी.पी. ढाकणे, जयश्री झरेकर, भारत गाडेकर, डॉ. तुकाराम गोंदकर, राजेंद्र फड, डॉ. अनिल गर्जे, स्वाती ठुबे व इतर सर्व पदाधिकारी, सल्लागार मंडळ व या संमेलनासाठी आवर्जुन उपस्थित निमंत्रित कवी, समीक्षक, साहित्यिक, पत्रकार, वाचक रसिक मित्र-मैत्रिणींनो!

**अहिल्यानगर २०२५**

सप्रेम नमस्कार!

इथे बोलताना मला आज अत्यंत आनंद होत आहे की, शब्दगंध साहित्य संमेलनाचे हे १६ वे वर्ष आहे आणि तुम्हाला तर माहितच आहे की सोळाव्या वर्षाला आपल्याकडे किती महत्त्व आहे. या वर्षावर मराठी-हिन्दी कवींनी किती कविता - गाणी लिहिली आहेत. त्यामुळे ऐन तारुण्यात पोहोचल्याची ही एक खूण आणि दुसरी खूण चळवळ परिपक्व झाल्याची! शिवाय या शहराचे नाव 'अहिल्यानगर' झाल्यानंतर 'शब्दगंध'चे हे पहिलेच संमेलन आणि त्या संमेलनात अध्यक्ष म्हणून संयोजन समितीने माझी निवड किती विचारपूर्वक केलेली आहे. ही बाब वैयक्तिक म झ्यासाठी खूप आनंददायी व गौरवास्पद आहे. त्यामुळे अगदी सुरुवातीलाच मी संयोजन समि तीतल्या सर्वांबद्दल ऋण व्यक्त करते.

मित्रहो!

मागील १५ वर्षांमध्ये मराठीच्या समाजम नाचा अवकाश समृद्ध करणाजया अनेक कवी, लेखक, विचारवंतांनी या संमेलनाच्या माध्यमातून मुळच्याच मऊशार असणाजया इथल्या भुईला अधिक कसदार, सुपीक बनवले आहे. ज्येष्ठ कवी गीतकार बाबासाहेब सौदागर यांच्या अध्यक्षतेने सुरू झालेले हे संमेलन पुढे फ.मुं. शिंदे, प्रकाश घोडके, लहू कानडे, इंद्रजीत भालेराव, भारत सासणे, कॉम्रेड गौविंदभाई पानसरे, अरुण म्हात्रे, कॉम्रेड डॉ. भालचंद्र कांगो, मा. खा. यशवंतराव गडाख, प्रल्हाद लुलेकर आदी महाराष्ट्रभरातील मान्यवर साहित्यिकांच्या उपस्थितीने चैतन्यमय झालेले आहे.

हे शहर माझ्यासाठी तसे नवे नाही. मागच्या २५ वर्षांपासून कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी या शहराशी जोडली गेलेली आहे. त्यामुळे माझा खूप मोठा मित्रांचा गोतावळा या शहरात आहे. चित्रकार प्रा. रवींद्र सातपुते सर आणि ताराताई, कवी मित्र शशिकांत शिंदे, संदीप काळे, छायाचित्रकार संजय दळवी, प्रा. संदीप सांगळे, ज्येष्ठ कथा व कादंबरीकार संजय कळमकर, ज्येष्ठ साहित्यिक मा. आमदार लहु कानडे साहेब, रेखाटनकार ज्योती डेरेकर, मित्र जयंत येलुलकर, दिनेश औटी, ज्येष्ठ कादंबरीकार मारोतराव वाघमोडे, ज्येष्ठ कवयित्री व माझी मैत्रिण सुमतीताई लांडे, कवी दिशा पिंकी शेख, कमल सुरुर, कैलास दौंड या सर्वांनी मला नेहमीच खूप प्रेम दिले आहे. यातील अनेकजण इथे उपस्थित आहेत तर जे काही कारणाने उपस्थित राहू शकले नाहीत, त्या सर्वांचीच मी कृतज्ञतापूर्वक आठवण काढत आहे.

मित्रांनो,

रुबाब-ए-रुतबा असणाजया अकबर बादशाहला शह देणारी अलौकीक बाणेदार स्वभावाची चाँदबिबी या शहराचं खरं भूषण आहे, तर याच भूमीतून प्रगतीशील राजकारण - समाजकारणाचं बाळकडू घेऊन तहयात लोककल्याणाची कामं करणाजया मुत्सद्दी राजकर्त्या पुण्यश्लोक अहिल्याबाईही इथल्याच! प्रवरा-मुळा-सीना-धुरा या उपनद्यांना पोटाशी घेऊन गोदावरी व भीमेच्या या समृद्ध काठावर वसलेल्या नगराकडे नेहमीच अख्ख्या महाराष्ट्राच्या समाजकारणाचे व राजकारणाचे लक्ष लागलेले असते.

त्यामुळे 'काहीही टाकलं तरी उगवून येणारा' हा जिल्हा आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. लोकांनी इथे सहकार टाकला तोही उगवून आला. तसेच डावी विचारसरणी, उजवी विचारसरणी, संघ विचारसरणी टाकली तीही उगवून आली.



इतकेच काय सुकाळ जसा आला तसा दुष्काळही उगवून आला. सगळं सगळं उगवून आले, फुलले आणि फळलेसुद्धा!

२८ मे १४९० ला मलिक अहमद निजामशहा बहेरी याच्या नावावरून या शहराची 'अहमदनगर' म्हणून स्थापना झाली. आणि पुढे हिंदुस्थानातील चार शाह्यांपैकी (कुतुबशाही, आदिलशाही, म ुघलशाही, निजामशाही) निजामशाहीला इथूनच सुरुवात झाली.

याच जिल्ह्यात 'पैस'च्या खांबाला टेकून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी अज्ञानी लोकांना ज्ञानी बनवणारी 'ज्ञानेश्वरी' लिहिली. याच जिल्ह्यात चक्रधर स्वामींनी अत्यंत महत्त्वाचा 'लीळाचरित्र' ग्रंथ लिहिला.

आपल्याकडे उपरोधाने म्हणतात, 'म रायला आला होता काय इकडे!' अक्षरशः या उपरोधिक विधानाला धरून दिल्लीच्या गादीवर असणारा शहेनशहा औरंगजेब राज्यविस्ताराच्या अतिलालसेने व मराठ्यांकडून दुखावल्या गेलेल्या अहंकारामुळे महाराष्ट्र जिंकण्याच्या इर्षेने म हाराष्ट्रात आला आणि शेवटच्या आजारात भिंगार (आलमगीर) येथे त्याचा मृत्यू झाला. पुढे त्याच्या इच्छेनुसार खुलताबाद येथे समाधी बांधण्यात आली.

इतिहासातील अनेक राजांना भुरळ घालणारा पण जिंकता न आलेला भुईकोट किल्ला याच नगर जिल्ह्यातील. पुढे याच किल्ल्यात चौथा शिवाजी (राजर्षी शाहू महाराजांचे वडील) यांना वेडा ठरवून, कैद करून ठेवले व तिथेच त्यांचा मृत्यू झाला. पुढे शाहू महाराजांनी ती जागा शैक्षणिक कार्यासाठी दान केली. आज तिथेच न्यू ऑर्ट कॉलेज चालते.

याच भुईकोट किल्ल्यात स्वातंत्र्य लढ्याच्या कैद्यांना इंग्रजांनी ठेवले होते. त्यात पंडित जवाहरलाल नेहरूही होते. त्यावेळी कैदेतील काळात नेहरूजींनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

याच ठिकाणी लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच!' ची आसमंत दुमदुमुन टाकणारी घोषणा केली.

नगरमध्येच मिशनरी शाळेच्या फरार मॅडमनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांना शाळेत कसे शिकवायचं? याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिलं आणि नंतर पुण्यात ऐतिहासिक मुलींची पहिली शाळा सुरू झाली.त्यानंतरच्या काळात म. फुलेंनी वेगवेगळ्या शहरात मुलींच्या शाळा सुरू केल्या. त्यातील एक इथे नगरमध्येही केली.

पुढे याच जिल्ह्यात पद्मश्री विखे पाटील आणि धनंजय गाडगीळ यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आशिया खंडातील पहिला साखर कारखाना काढला.

नगरमध्येच, इथून हाकेच्या अंतरावर गावातील लोकांना सोबत घेऊन गावा-गावांचा विकास करून हरित क्रांती घडविणारे पोपटराव पवार व जनसामान्यांना माहितीचा अधिकार प्राप्त करून देणारे अण्णा हजारे राहतात. सर्वसामान्यांचे श्रद्धास्थान असणारे भगवानगड, देवगड, शिर्डी, शिंगणापूर, नेवासे ही अध्यात्मिक उन्नतीची प्रसिद्ध स्थळे नगरमध्ये जशी आहेत तशीच गाढवांचा बाजार भरवणारी मढीची जत्राही नगर जिल्ह्यात भरते..

सगळीकडे 'सरकारी कर्मचाजयांना सरकारचे जावई' म्हणतात, त्यांनासुद्धा कुणी दुखावत नाही. मग खजया जावयाची तर बातच सोडा! पण नगर जिल्ह्यातील बारागाव नांदूरच्या लोकांचा 'नाद'च वेगळा! ते म्हणे आपल्या जावयांची गाढवावरून मिरवणूक काढतात... आत्ता बोल्ला! हे धाडस फक्त नगरचेच लोक करू शकतात.

आपल्या प्रतिभेच्या जोरावर अख्ख्या म हाराष्ट्राला सुपरिचित असणारे चित्रपट निर्माता कवी रामदास फुटाणे, प्रसिद्ध कादंबरीकार प्रा. रंगनाथ पठारे, ज्येष्ठ लेखक रावसाहेब कसबे, मधुकर तोरडमल, अनुवादक विलास गीते, कथाकार भारत सासणे, कवयित्री संजीवनी खोजे, चंद्रकांत भोंजाळ, सुभाष डाके, अभिनयाच्या क्षेत्रात सदाशिव अमरापूरकर, मिलिंद शिंदे, शिल्पकार अनिल कांबळे या सर्व नगरवासियांनी जशी नगरच्या नावलौकिकात भर घातली तशीच चित्रकार श्रीधर अंभोरे यांनीही रंगरेषांच्या माध्यम ातून नगरचा लौकीक वाढता ठेवलेला आहे. याशिवाय अनेकजण या समकाळात स्वयंप्रतिभेने लिहीत आहेत. कुणालाही या शहराच्या वारशाचा हेवा वाटावा, असे हे शहर आणि त्याचा इतिहास समृद्ध आहे.

मित्रांनो, आणखी एक आवर्जून सांगावंसं वाटतं की, जीवनात जसे वेगवेगळे 'रस' असल्याशिवाय मजा येत नाही. तसेच साहित्यातही वेगवेगळे प्रवाह व रस असल्याशिवाय अजिबात मजा येत नाही. तो वाढविण्याचं काम नगर जिल्ह्याातील शेंडी पोखर्डी या गावचे लोक मोठ्या कल्पकतेने करतात. अलिकडचं माहित नाही. पण पूर्वी या गावात दोन गटाचे लोक समोरासमोर येऊन 'शिव्यांचं युद्ध' खेळायचे. शिव्यांचे युद्ध! किती भन्नाट कल्पना आहे. मनुष्य प्राणी आणि शिव्या! जगण्याचा अविभाज्य भाग. गावाकडे तर उठता-बसता शिव्या ऐकायला भेटतात. झणझणीत दोन-चार शिव्या ऐकल्या की कसे जिवंत असल्यासारखं वाटतं. एक किस्सा सांगते- म ाझी छोटी लेक दहा-बारा वर्षांची होती, तिला वाचनाची आवड होती. तिच्या वयाची पुस्तकं वाचून झाले की ती येता-जाता पुस्तकांच्या कपाटातील पुस्तकं वाचायची. द. ता. भोसले यांचे एक विनोदी पुस्तक 'मी आणि माझा बाप' ती वाचत होती. त्यातल्या शिव्या ती लिहून ठेवीत असे. त्यानंतर राजन गवस, भालचंद्र नेम ाडे यांच्या शिव्यांचा संग्रह सुरू झाला. इथपर्यंत ठीकच आहे. त्यांचे अर्थ तिला समजले नाही की ती मला- तिच्या वडिलांना विचारीत असे. हलक्या-फुलक्या शिव्यांचे अर्थ आम्ही सांगून तिचं समाधान करीत असू. पण काही काही शिव्यांचे अर्थ सांगण्यापलीकडचे असतात... मग काय? आम्ही म्हणायचो, आजी आली की आपण तिला विचारू! माझी आई म्हणजे काय- बोली भाषेतल्या शिव्यांचा जणू खजिनाच! आईशी बोलताना मला नेहमीच असे वाटते की, शिव्या तिच्या जिभेवर जटा सोडून जणू थयथय नाचताहेत की काय... कमी-अधिक सगळ्याच जुन्या माणसांबद्दलचा हाच अनुभव असतो.

मित्रांनो, मला वाटतं, शिव्या या आपल्या ग्राम्य संस्कृतीचा भाग आहे. दोन-चार शिव्या खाल्ल्या की माणसं कशी सूतासारखी सरळ होतात, ते मी लहानपणी अनुभवले आहे. सभ्यतेच्या नावाखाली आपण फारच गुळचट नि गुळगुळीत जगतोय की काय, असंही वाटतं कधी कधी! असो, लेखक सर्वसामान्यपणे इतरांसारखाच वाटत असला तरी तो स्वतःच एक अत्यंत जबाबदार नैतिकता असते. जात-धर्म-परंपरा, भौतिक सुखाच्या मागे धावणारा भोवताल या सामाजिक वास्तवामध्येच लेखकही जन्माला येत असतो. सुरुवातीला काही काळ ती त्याची प्राथमिकता असते. पण पुढे धर्म, जात, शिक्षण, लिंगभाव, राजकारण या सर्वांचे आघात झेलत त्याच्या वाट्याला येणारा संघर्ष संवेदनशीलतेने व अन्यायकर्त्यांचे आकलन करून कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न करीत असतो आणि कोणत्याही काळातल्या लेखक-लेखिकेला हे चुकलेले नाही. ते सतत आजुबाजूच्या भोवतालात प्रेरणा शोधत राहतात, मग त्या जीवनाच्या असोत की लिहिण्याच्या...

व्हिक्टर फ्रेंकेल नावाचा मानसरोगतज्ज्ञ होता. तो जर्मन होता, म्हणून दुसजया म हायुद्धाच्या काळात तो जर्मनीच्या कॉन्सन्ट्रेशन कॅम्पमध्ये कैदी होता. तिथे भयंकर छळ चालायचा. त्या छळाला कंटाळून दोन-चार दिवसांनी एकतरी कैदी आत्महत्या करायचा. व्हिक्टर फ्रेंकलेच्या लक्षात आले की, आपल्याही मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले आहेत. ते कसे थांबवता येतील याचा तो विचार करू लागला आणि शेवटी त्याला एक तत्व सापडले की, एखादं अपूर्ण स्वप्न जगण्याची प्रेरणा बनली तर जीवनाला प्रयोजन सापडतं व आत्महत्येचे विचार दूर होऊन संघर्ष करण्याची उर्मी प्राप्त होते. एकदाका हे तत्व समजले तर जीवनाचे मर्म (खरेपण) कळते. जीवनामध्ये कुठलेही संकट मृत्यूपेक्षा मोठे नसते, या दृष्टिकोनातून संकटाला सामोरे जाता आले तर जीवन जगण्याचे अनेक प्रयोजन आपल्याला सापडतील.


कवी कुमार वीरेंद्र यांची नुकतीच एक कविता माझ्या वाचनात आली. यातून गावागावांतून दिसणाजया समाजमनाचं वास्तव चित्रण कवीनं रेखाटलं आहे. कविता अशी आहे-

हे गाव असं आहे...
सूर्य उगवत होता
आज्जी घराच्या
मागच्या बाजूला शेण कालवत होती
काही लोक घोषणा देत थेट दरवाजात आले,
मी शेणगोळे करत उभा होतो, आज्जी पाठोपाठ आलो,
बघितले तर वडिल त्यांच्यावर ओरडताहेत
वडिलांचं रागावणं अनेकदा बघितलं होतं, पण असं पहिल्यांदा
त्यांचे डोळे धगधगणारे लालबुंद दिसले
सूर्य उगवत होता
आणि आज्जी दरवाजाच्या आडोशाला उभी राहून ऐकत होती
वडिल संतापून बोलत होते,
तुम्हाला कळतंय का, तुम्ही काय करताय,
अरे गावात दोन-चारच घरे आहेत त्यांची,
आज रामाच्या नावावर विटा मागताय
उद्या रामाच्या नावावर त्यांचे खून कराल... जरा विचार करा.
मावळतीकडं राहतात गुण्यागोविंदाने
सगळे सणवार आपल्यासोबत साजरे करतात...
निघा, निघा इथून...
आणि बरं झालं ते बिनबोलता निघून गेले
ते लांब जाईपर्यंत आजी त्यांच्याकडे बघत राहिली
सूर्य उगवला होता
मी शेणगोळे करून देत होतो, आजी शेणी थापत होती, पण
कुणास ठाऊक
कुठे हरवली होती, विचारले तर म्हणाली, 'काही नाही बाळा,
दे आज सगळ्या शेणी थापून टाकते
किती दिवसांपासून पडून राहिलंय शेण,'
शेणी थापून झाल्यावर तोंड धुवायला निघालो तर
जनावरांसाठी रांजण बनवायला दरवाजाजवळ ठेवलेल्या विटा
एकेक करून अंगणात ठेवायला लागली.
मी विचारलं, आईनं विचारलं तर म्हणाली,
'अरे दरवाजात असल्या किंवा अंगणात असल्या काय फरक पडतो'
सूर्य उगवला होता
परंतु आज्जीला कुठंतरी हरवलेलं पाहून वाटत होतं
ना सूर्य उगवलाय, ना चंद्र
कोरभर भाकरी खाऊन सोप्यातल्या खाटेवर पहुडली होती आज्जी,
तिच्याजवळ गेलो. म्हणालो, 'आज्जे, माहितीये तू का उदास आहेस ते
वडील विटांवरून ओरडले म्हणून ना'
आज्जी थोडा वेळ गप्प राहिली,
थोड्या वेळानं माझ्या डोळ्यांत काहीतरी शोधत असल्यासारखी म्हणाली,
'बाळा, आता तुम्ही सगळे भाऊ लवकर लवकर मोठे व्हा,
मोठं होऊन बाळा, बापाच्या मागं आधाराला उभे राहा.
बाळा, गोष्ट विटांपुरती नाही,
हे असं गाव आहे, जिथं

पान ३ वर

## केरे गावच्या नूतनीकरण ग्रामदेवता मंदिराचा १५ पासून जीर्णोद्धार सोहळा

**गुहागर । प्रतिनिधी -** चिपळूण तालुक्याच्या मध्यस्थी व निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या केरे गावचं ग्रामदैवत असणाऱ्या पुरातन मंदिराचे नूतनीकरण काम पूर्ण झाले असून मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्तीसंस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवार दि.१५ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी या कालावधीत हा सोहळा पार पडणार आहे.शनि. १५ रोजी नवीन मूर्ती



वाजत - गाजत मिरवणूकसह मंदिरात आणणे,रविवार १६ रोजी होम हवन याग व रात्रौ १० वा.केरे ग्रामस्थ यांचे नमन तर सोमवार दि.१७ रोजी नवीन मूर्ती प्राणप्रतिष्ठा व धार्मिक कार्यक्रम, श्री सत्यनारायण महापूजा व रात्रौ ९. ०० वा.रत्नागिरी जिल्ह्यातील लोकप्रिय असणारे हौशी कलाकार नमन मंडळ ( गोळवली - संगमेश्वर ) यांचे नमन सादर होणार आहे.सदर सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त केरे गाव ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ/ महिला मंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** अंबड एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस ५१ पदे मानधनावर भरण्यात येणार आहेत. अर्जाचा विहीत नमुना ग्राम पंचायत व अंगणवाडी केंद्रात उपलब्ध करुन दिलेला आहे.

तरी किमान बारावी उत्तीर्ण वय १८ ते ३५ दरम्यान असलेल्या स्थानिक महिला अर्जदारांनी शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आपले अर्ज अंबड येथील पंचायत समि तीच्या परिसरातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पात सादर करावेत, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंबड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसीसाठी आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्याचा लाभ कायम रहावा यासाठी ई-केवायसी आणि म ोबाईल सिडींग करुन घेणे आवश्यक आहे. तरी तहसील



कार्यालयाकडून तालुक्यातील गावामध्ये ई-केवायसीसाठी जनजागृतीपर शिबीरे घेण्यात येणार आहेत. तरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांनी शिबीरात येवून ई-केवायसी अवश्य करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

स्वस्त धान्य वितरण प्रणाली पारदर्शक व्हावी यासाठी शासनाने सुरु केलेल्या ई-केवायसीबाबत काही शिधापत्रिकाधारक उदासीन दिसत आहेत. ५ लाख ६५ हजार ७०० लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवासी केलेली नसल्याचे दिसुन आले आहे. तरी दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ई-केवायसी न केल्यास या लाभार्थ्यांना स्वस्त धान्यापासून कायमचे वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. लाभ मिळण्यासाठी अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिका धारकांच्या हाती आणखी काही दिवसाची अवधी आहे. आपल्या तालुक्यातील गावात ई-केवायसी सिडींग करुन घेण्यासाठी सर्व गावामध्ये शिबीर घेण्यात यावेत. अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. शिधापत्रिकाधारक व कुटूंबातील सदस्य स्वस्त धान्यापासुन वंचित राहू नये यासाठी ई-केवायसी करणे अत्यंत गरजेचे आहे. जालना-१३६९४२, बदनापुर-४९६४६, भोकरदन-७६२६१, जाफ्राबाद-३५५५१, मंठा-५५५६६, परतूर-५६९६४, अंबड-८७१६८, आणि घनसावंगी -६७७०० याप्रमाणे तालुकानिहाय शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. असेही कळविले आहे.

## भारतीय जैन संघटनेच्या नूतन जिल्हा कार्यकारिणीचा उद्या शपथविधी सोहळा

# राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला यांची प्रमुख उपस्थिती-विजयकुमार जैन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जैन संघटनेची विभागीय कार्यकारणी, जालना जिल्हा कार्यकारिणी व महिला कार्यकारिणीच्या नवनियुक्त अध्यक्षांचा शपथविधी सोहळा रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता गुरु गणेश भवन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यानंतर जैन संघटनेच्या प्रदेश कार्यकारणीची सभा होणार आहे. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांनी केले आहे.

अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला हे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून भारतीय जैन संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विनयकुमार कोठारी, स्वागताध्यक्ष म्हणून विभागीय उपाध्यक्ष विजयराज सुराणा, प्रमुख अतिथी म्हणून प्रदेश उपाध्यक्ष केतन शाह, प्रदेश सचिव प्रविण पारख, राष्ट्रीय महामंत्री दिपक चोपडा, उद्योगपती गौतमचंद श्रीश्रीमाळ, जालना पीपल्स बँकेचे चेअरमन संजयकुमार मुथा यांची उपस्थित राहणार आहे.

याप्रसंगी भारतीय जैन संघटनेच्या विभागीय कार्यकारणीचे अध्यक्ष धनराज सोळंकी, जालना जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन, सचिव दीपक मोदी, उपाध्यक्ष रवींद्र संचेती, गौतम श्रीश्रीमाळ, ड. अनिल संचेती, पवन सुराणा, सहसचिव स्वप्निल लव्हाडे, कोषाध्यक्ष श्रीपाल मरलेचा, जनसंपर्क अधिकारी ओम धोका, कार्यकारणी सदस्य विजय बाफना, चैतन्य वायकोस, शुभम पिपाडा, जय कोटेचा, अतुल बिनायकीया, पंडित खुळे, रविराज धोका, कुशल गेल्डा, प्रणय पहाडे, चेतन बोथरा, सिद्धार्थ संचेती, अजय बोरा, कुशल देसरडा, आशिष शाह, योगेश कासलीवाल, हर्षवर्धन सेठिया, नीरज सेठीया, पंकज जैन,तसेच महिला कार्यकारणीच्या अध्यक्ष सौ. सरिता प्रविणकुमार कुचेरिया यांना राष्ट्रीय अध्यक्ष शपथ देणार आहेत. यावेळी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जैन संघटना, जिल्हा जालनाच्यावतीने करण्यात आले आहे.






पान २ वरून

# १६ वे शब्दगंध साहित्य संमेलन; संमेलनाध्यक्षीय भाषण

प्रत्येक दुबळा माणूस
मुसलमान आहे!
(मूळ हिंदी कविता - कुमार वीरेंद्र,
अनुवाद - विजय चोरमारे)

या एकाच कवितेवरून आज जगभरातील प्रत्येक गावात नेमकं काय सुरू आहे, याची कल्पना येते. प्रत्येक शेजारी देशांसोबत - राज्यांसोबत सतत चालणारे युद्ध, वाढणारी स्पर्धा, त्यातून निर्माण होणारी असुरक्षितता आपण रोज अनुभवत आहोत. युद्ध हे फक्त दोन देशांपुरतेच राहत नसते. तर ते घरापर्यंत आणि व्यक्तीपर्यंत येऊन पोहोचते. त्याचे परिणाम सगळ्यांनाच सोसावे लागतात. प्रचंड वाढलेला जातीयवाद, धर्मा-धर्मांतील द्वेष, विखार, प्रतिशोधाची भावना माणसाला हिंसक बनवत आहे. समूहाने निघणारे मोर्चे, निदर्शने, होणाजया जाळपोळी, जातीय समूहांची आक्रमकता वातावरणात दहशत निर्माण करणारी आहे.

आज घडीला मागील काही वर्षांपासून सुरू असलेले रशिया भाणि युक्रेनचे गुद्ध पाहिले तर त्याची भीषणता लक्षात येईल. त्या देशांतील लोकांच्या जीवनावर त्याचे इतके गंभीर परिणाम झालेत की शहरं, गावं नष्ट झाले आहेत. श्रीलंका आणि बांगलादेशमध्ये झालेले जनआंदोलन असो की आपल्या देशामध्ये घडणाजया मणिपूरसारख्या मनोवस्था सैरभैर करणाजया घटना असोत. मणिपूरमध्ये महिलांवर ज्या पद्धतीचे अत्याचार झाले ते पाहून आपण मानव तरी आहोत का? यावर शंका घ्यावी असे चित्र आहे.

सध्याचा काळ संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारा आहे. सगळ्याच गोष्टी खूप गतीने बदलत आहेत. नैतिक मूल्यांचा जहास, निसर्गाचा जहास, त्यातून होणारे हानीकारक बदल, मानवी जीवनावर या बदलांचा होणारा परिणाम, नातेसंबंधात आलेली भावनिक बधिरता, ओल हरवलेली कुटुंबव्यवस्था, एकेकटे पडत जाणारी माणसं. या सगळ्यांचा विचार केला की गरगरायला होतं. कुठे चाललोय आपण? कुणालाच कुणासाठी नसणारा वेळ, रोजच्या घटस्फोटांचं वाढतं प्रमाण, वाढती गुन्हेगारी, घसरत चाललेले राजकारण, त्यातून येणारी अस्थिरता, अलिकडे कुणालाच कुणाबद्दल विश्वास वाटत नाही. शेजारी बसलेल्या माणसाकडेसुद्धा आपण संशयी नजरेने पाहत आहोत. श्रीमंत अति श्रीमंत होत आहेत आणि श्रमिक अति गरीब! शेतकजयाला काबाडकष्ट करूनही कर्जबाजारीपणा आला आहे, तो फासावर लटकत आहे आणि दलाल शेतकजयांच्या जमिनी विकत घेत आहेत. हे कोणते परिवर्तन? मुली आणि स्त्रिया ना घरात सुरक्षित आहेत, ना गावात, ना देशात! आणि तरी आम्ही वर्गांमधून बंधूभावाच्या प्रार्थना शिकवत आहोत. हे सगळंच चित्र उद्विग्न करणारं आहे. अशा विमनस्क स्थितीत लेखक-कवींकडेच काय ते आशाळभूत नजरेने पाहावे लागेल. साहित्यातच नवा विचार पेरण्याची क्षमता असते.

साहित्य आपल्या बुद्धीची लवचिकता वाढवते, आकलनाच्या कक्षा विस्तारत नेते. आपली आत्मिक आणि अध्यात्मिक शक्ती वाढीस लावते. आपल्याला मुळातून बदलू शकते. संवेदनशील बनवते. जे माणूसपणापासून दूर गेले आहेत, त्यांना परत माणूस करण्याची अपार ताकद साहित्यात असते. साहित्य हे तोडण्याचे नाही तर जोडण्याचे काम करते. तुम्ही जगावर प्रेम करायला शिकवणाजया ज्ञानेश्वर माऊलींचं पसायदान वाचा. संत तुकाराम, जनाबाई, चोखामेळा, गोरा कुंभार, कान्होपात्रा वाचा. साने गुरूजींचे साहित्य वाचा, तुम्हाला याची प्रचिती येईल. करुणेनं ओथंबलेले कविवर्य ना.धों. महानोरांची एक फार सुंदर कविता आहे बघा- 'सूर्यनारायणा नित नेमाने उगवा। अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा।' म्हणूनच म्हणते मित्रांनो, प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा घटक असतो. जर समाज जगला नाही तर व्यक्ती कसा जगेल? म्हणून समाजाला वाचवणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. तुम्ही कधी जंगलात गेला आहात का? जंगलात जेव्हा सांबर ओरडते, तेव्हा त्याचा असा अर्थ होतो की, वाघ जवळपास दबा धरून बसलेला आहे. सांबर आपल्या कळपाला इशारा देते की, सावध राहा. पण ते करताना वाघाला कळते की सांबर स्वत: कुठे आहे? सांबर आपला जीव धोक्यात टाकून ते कळपाला सावध करते. त्याला हा परोपकार कोणी शिकवला? कळपाच्या सुरक्षिततेसाठी वेळप्रसंगी आत्मत्याग करायला ते कुठल्या शाळेत शिकतं? तर निसर्गानेच सांबराच्या जिन्समध्ये ही समज दिलेली आहे की, कळप वाचला तरच सांबर वाचेल, नव्हे अनेक सांबर तयार होतील. त्यामुळे फक्त स्वत:वर प्रेम करावं, हा स्वार्थी विचार सोडून निसर्गाकडून अनेक गोष्टी घेण्यासारख्या आहेत. नेमके इथेच आपण चुकत असल्यामुळे अनेक समस्यांचा आज आपण सामना करत आहोत.

एकदा एक गोंधळलेला माणूस बापूंकडे गेला आणि म्हणाला, 'पुढे काय करू?' बापू म्हणाले, मी तुला एक युक्ती सांगतो, तुझा प्रश्न हमखास सुटेल. जेव्हा जेव्हा जीवनात तुझ्या मनात द्वंद्व उभं राहील आणि स्वार्थ प्रबळ होईल, तेव्हा-तेव्हा आयुष्यात पाहिलेल्या सर्वांत दु:खी, कष्टी, हतबल माणसाचा चेहरा आपल्या डोळ्यांपुढे आण आणि स्वत:ला प्रश्न विचार की, मी जे काही पुढचं पाऊल उचलू पाहत आहे, त्यामुळे त्या माणसाची हतबलता कमी होणार आहे का? ही कसोटी लावलीस की तुला लक्षात येईल तुझ्या मनातला स्वार्थ कमी व्हायला लागला आहे.

मित्रांनो

जे ज्ञान तुम्हाला तुमच्या बंद वर्तुळाच्या पलीकडे घेऊन जात नाही, ते अज्ञानापेक्षाही वाईट असते. आज आपल्याच सांस्कृतिक कोशात स्वत:च्याच वर्तुळात जाणारा एक वर्ग आहे. त्याला आपण मोबाईलधारी म्हणूया! मी आणि माझा मोबाईल. त्यांचे एवढंच सीमित विश्व झाले आहे. या मोबाईलचा वापर खरे तर सुखावह सोयीसाठी व्हायला हवा. पण त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याच्या अतिवापरामुळे चिडचिडेपणा हेकेखोरपणा वाढला आहे. गुन्हेगारी, मनोरुग्णांची संख्या वाढत आहे. शिवाय ऑनलाईन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे, माध्यमांमुळे आपल्याला एकमेकांविषयी खूप माहिती आहे. एकमेकांचे विचारही माहीत आहेत, खरं तर या माहीत असण्याचा उपयोग एकमेकांना समजून घेण्यासाठी व्हायला हवा. मात्र असे क्वचितच होते. उलट ही माहिती आपल्याला एकमेकांपासून दूर घेऊन जात आहे. स्वत:बद्दल आपण जास्त अहंकारी आणि दुसजयाबद्दल जास्त दुराग्रही व्हायला शिकत आहोत. प्रत्येकाभोवतीचं वर्तुळ जास्त उंच अधिक बंदिस्त बनत चाललेलं आहे. त्यामुळे जगण्यातील उत्कटता हरवता कामा नये. निरागसता हरवता कामा नये, उत्कट साहित्यनिर्मितीतील एक उदाहरण पाहण्यासारखे आहे.

रामायण लिहून झाल्यावर वाल्मिकीने ते नारदाला दाखवले. नारदाने ते वाचले. पण त्याचे समाधान झाले नाही. ते म्हणाले की, 'हनुमानाचे रामायण यापेक्षा चांगले आहे.' हनुमानानेही रामायण लिहिले आहे, हे वाल्मिकीला माहीतच नव्हते. ते त्याच्या शोधात निघाले. दोघांमध्ये कोणाचे रामायण खरे आहे, हे त्यांना जाणून घ्यायचे होते. कर्दळी वनामध्ये केळीच्या झाडाच्या सात मोठ्या पानांवर लिहिलेले रामायण त्यांना सापडले. त्यांनी ते वाचले आणि ते सर्वोत्कृष्ट असल्याचे लक्षात आले. व्याकरण आणि शब्दसंग्रह, श्लोक आणि लय यांचा मोठा समतोल त्यांच्याकडे होता. वाल्मिकीच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. हे पाहून हनुमानाने विचारले, 'तुम्ही का रडत आहात?' वाल्मिकी म्हणाले, 'तुमचे रामायण इतके सुंदर आहे की, आता माझे रामायण कोण वाचणार?' हे ऐकून हनुमानाने ती केळीची पाने फाडून टाकली आणि म्हणाले, 'आता हनुमानाचे रामायण कोणी वाचू शकणार नाही.' वाल्मिकी स्तब्ध झाले. त्यांनी हनुमानाला असे का केले? असे विचारले. त्यावर हनुमान हसले आणि म्हणाले - 'तुम्हाला माझ्यापेक्षा रामायणाची जास्त गरज आहे! जगाला वाल्मिकी आठवावेत म्हणून तुम्ही रामायण लिहिलेत.' वाल्मिकीला कळले की आपले रामायण हे महत्त्वाकांक्षेचे फळ आहे, तर हनुमानाचे रामायण भक्ती आणि आपुलकीचे फळ आहे.

कौतुकाचं धिरडं आणि कसं खाऊ कोरडं

स्त्री साहित्याची अभ्यासक आणि साहित्य चळवळीतील कार्यकर्ता म्हणून स्त्रियांच्या साहित्याबद्दल आणि स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल माझी काही निरीक्षणे नोंदवण्याची गरज वाटते.

जात्या तू ईश्वरा, कुन्या डोंगरीचा ऋषी
तुझ्यापुढे उकलिते, माझ्या हृदयाच्या राशी

असे म्हणत मौखिक परंपरेच्या ओव्यांनी स्त्रियांच्या मनावरचं दगडाएवढं जड ओझं हलकं केलं खरं! पण जगण्यातलं जडावलेपण काही दूर होऊ शकलेलं नाही. संत कवयित्रीच्या कवितेतील जाणीव भक्ती-मुक्तीपुरतीच मर्यादित न राहता 'डोईचा पदर खांद्यावर घेऊन भरल्या बाजारात जाण्याची धिटाई जनाबाईंच्या कवितेने दाखवून स्त्रीवाद उजागर केलेला आहे. या तुलनेत नंतरच्या कवयित्रींना स्त्रीवादाची मांडणी करायला बराच उशीर झाला, असे म्हणावे लागेल.

मधल्या काळात ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले आणि मुक्ता साळवेच्या लेखनाने मेंदूला थोड्याशा झिणझिण्या आणल्या होत्या. त्यानंतर स्त्रीमुक्ती चळवळीपर्यंत मात्र भावकविता मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेल्या. पाश्चात्त्य देशात मात्र स्त्रीवादी ओळख तशी लवकर झालेली होती. स्त्रियांचं बायबल समजलं जाणारं सिमोन द बोव्हुआरचं 'द सेकंड सेक्स' १९४९ सालीच प्रसिद्ध झालं होतं. आपल्याकडे मात्र स्त्रीवाद पोहोचायला १९७०-७५ साल उजाडावं लागलं. त्यामुळे तसं पाहिलं तर आजही स्त्रियांच्या जीवनाची स्थिती फार काही बदललेली आहे, अशातला भाग नाही. मुळात त्यांच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन आजही बदललेला नाही. शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम होत स्वत:च्या हिमतीवर जगणाजया स्त्रिया दिसत असल्या तरी ते प्रमाण लोकसंख्येच्या दृष्टीने अत्यल्प आहे.

औद्योगिक व राजकीय वर्तुळात अजूनही बजयापैकी पुरुषांचे वर्चस्व आहे. आज स्त्रिया घराचा उंबरा ओलांडून बाहेर वावरू लागल्या खजया पण 'हे जग पुरुषांचे आहे', ही पुरुषांची मानसिकता आणि भूमिका टिकून आहे. याची अनेक मासलेवाईक उदाहरणे आपण रोजच्या जगण्यात पाहत असतो. स्त्रियांचे हक्क हिरावून घेण्यासाठी आजही पुरुष अनेक खटपटी-लटपटी करीत असतो. शिवाय अगदीच सुमार बुद्धीचा पुरुष कर्तृत्वहीन पुरुषसुद्धा स्त्रियांच्या समोर स्वत:ला श्रेष्ठ समजत असतो. स्त्रीला निराळे समजण्याची प्रथा जुनीच आहे. प्रत्येक धर्माने अगदी सुरुवातीच्या काळात बौद्ध धर्मानेही स्त्री निषिद्ध मानली गेली होती. मधल्या काळात म. फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे स्थिती थोडी सुधारली गेली होती. पण आज पुन्हा स्त्रियांच्या समस्येत वाढ झाली आहे. स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराचे प्रमाण खूप वाढले आहे. त्या पुन्हा धार्मिकतेच्या विळख्यात अडकत चालल्या आहेत. बजयाचशा या स्वत:च्या अवस्थेला स्वत: स्त्रियाच कारणीभूत आहेत. कायद्याने दिलेल्या हक्काच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी अनुकूल अशी सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमी स्त्रिया तयार करू शकल्या नाहीत. याला काही प्रमाणात स्त्रियांचा बौद्धिक आळस तर काही प्रमाणात उमेदीचा अभाव कारणीभूत आहे. शिवाय अनेकींना संघर्ष न करता सोयीचं परावलंबित्व हवंहवंसं वाटत असतं. स्वतंत्र निर्णयक्षमतेचा अभाव हेही एक महत्त्वाचं कारण असू शकतं. म्हणूनच लिहित्या स्त्रियांनी आपल्या कविता-कथांमधून नवनव्या प्रश्नांना वाट मोकळी करून देणं गरजेचं आहे.

चेकॉव्ह म्हणतो, 'समस्येचे उत्तर शोधणे आणि आपले प्रश्न नीट विचारत राहणे, या दोन पूर्णत: भिन्न गोष्टी आहेत. प्रश्न विचारीत राहणे, ही साहित्याची जबाबदारी आहे.

माझी एक कवयित्री मैत्रीण वृषाली किन्हाळकर लिहिते-

तुमच्या तमाम इच्छांची
ओझी वाहतांना
हे मी विसरलेच होते
की माझ्या पाठीलाही
ताठ होता येते...

स्त्रियांच्या साहित्याकडे पाहिले तर कविता हा वाङ्मय प्रकार त्यांना जास्त जवळचा वाटतो. त्यामुळे विपुल प्रमाणात कविता लेखन स्त्रिया करताना दिसतात. त्या तुलनेत कथा, कादंबरी, समीक्षा, ललित, नाटक या प्रकारात मोजकीच नावं सोडली तर दर्जेदार - सकस लेखनाचा अभाव आहे. शिल्पकार, चित्रकार, छायाचित्रकार, पत्रकार या अशा क्षेत्रात अजूनही फारशा स्त्रिया दिसत नाहीत.

व्यासंग वाढवत नेत कामाच्या शैलीत - लेखनात प्रयोग करणे गरजेचे असते. भूमिकेवर ठाम राहून समस्यांवर मात करणे. मुद्द्यांसाठी आग्रही राहणे. या गोष्टी स्त्रियांनी मनातून ठरवण्याची गरज आहे. बौद्धिक आणि वैचारिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांनी जाणिवपूर्वक काम करण्याची गरज आहे. कारण, सत्तास्थानावर गेल्याशिवाय (मग त्या कोणत्याही असोत. धर्मसत्ता, राजसत्ता, ज्ञानसत्ता, अर्थसत्ता) निर्णय स्वातंत्र्य मिळणार नाही. तुमचं मत ग्राह्य धरलं जाणार नाही. आत्मउन्नतीमध्ये निर्णय स्वातंत्र्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. किती आणि कसं बघा!

किंग ऑर्थर हा न्यायप्रिय, सुस्वभावी आणि शूरवीर, लोकप्रिय राजा प्राचीन रोममध्ये ६ व्या शतकात होऊन गेला. एकदा एका युद्धात शत्रूने त्याचा पराभव केला. शत्रू राज्याच्या राजाने त्याचे राज्य काबीज करून त्याला ठार मारण्याची आज्ञा दिली. पण, का कोण जाणे किंग ऑर्थरच्या चांगल्या स्वभावाचा, लोकप्रियतेचा प्रभाव म्हणा, इतर काही. त्याने मृत्यूदंडाच्या शिक्षेत सूट दिली. त्याने किंग ऑर्थरसमोर एक प्रश्न ठेवला आणि जर किंग ऑर्थर त्या प्रश्नाचे योग्य उत्तर देऊ शकला तर त्याची मृत्यूदंडाची शिक्षा माफ होऊन त्याचे जिंकलेले राज्यही त्याला सन्मानाने परत देण्यात येईल, असे जाहीर केले. यासाठी किंग ऑर्थरला एका वर्षाचा कालावधीही मंजूर करण्यात आला.

प्रश्न असा होता, 'स्त्रीला नेमके काय हवे असते...?'

किंग ऑर्थर आपल्या राज्यात परत आला आणि राज्यातील सर्व ज्ञानीजनांना, स्त्रियांना, धर्मगुरूंना, संपूर्ण प्रजेला या प्रश्नाचे उत्तर शोधण्यास सांगितले. पण कुणीही समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही.

शेवटी मंत्रिगणांनी त्याला राज्याच्या बाहेरील किल्ल्यात राहणाजया ज्ञानी चेटकीणीकडे जाण्याचा सल्ला दिला.

आपल्या जादुविद्येच्या बळावर कुठल्याही समस्येवर योग्य उपाय सांगून ती सोडवण्यात चेटकीणीचा हातखंडा होता. अर्थात, ती त्याबदल्यात प्रचंड मोबदलाही घेत होती.

किंग ऑर्थरला हा उपाय फारसा पसंत पडला नाही. पण वर्ष संपायला फक्त दोन दिवस उरले आणि तरीही योग्य उत्तर न मिळाल्याने चेटकीणीकडे जाण्यावाचून त्याला गत्यंतर उरले नव्हते.

चेटकीणीने प्रश्न ऐकून घेतला आणि जोरात हसून म्हणाली,

'या प्रश्नाचे उत्तर तर अगदीच सोपे आहे. राजा, पण ते देण्याआधी माझीही एक अट आहे.'

'कसली अट', राजाने विचारले.

'तुझ्या राज्याचा तरुण सेनापती लॅन्सैलॉट याला माझ्याशी लग्न करावे लागेल.'

सेनापती लॅन्सेलोट हा किंग ऑर्थरचा जीवलग मित्रही होता. त्यामुळे स्वत:च्या फायद्यासाठी आपल्या मित्राचा बळी देणे किंग ऑर्थरला योग्य वाटले नाही. पण मित्रप्रेमापोटी खुद्द लॅन्सेलॉट या लग्नासाठी तयार झाला. राजवाड्यात थाटात लग्नसोहळा पार पडला. आणि मग किंग ऑर्थरने त्या जीवघेण्या प्रश्नाचे उत्तर विचारले.

'स्त्रीला नेमके काय हवे असते?'

चेटकीणीने उत्तर दिले - 'स्त्रीला आपल्या आयुष्यातील प्रत्येक निर्णय आपल्या मनाप्रमाणे घेण्याचे स्वातंत्र्य हवे असते.'

हे उत्तर ऐकून किंग ऑर्थर प्रसन्न झाला आणि तिथे उपस्थित सर्वांनी संमतीची मान डोलावली. शत्रू राजाने किंग ऑर्थरची सन्मानपूर्वक सुटका केली.

इकडे मधुचंद्राच्या रात्री लॅन्सेलॉट चेटकिणीच्या शयनकक्षात आला. तिचे भयंकर आणि ओंगळवाणे रूप पाहून तो स्तब्ध झाला. चेटकीण त्याला म्हणाली, 'तू माझे हे रूप पाहूनही माझ्याशी लग्न करायला तयार झालास, त्यामुळे मी खूप खूश आहे. हे माझे खरे रूप नाही. लोकांना दूर ठेवण्यासाठी अंगिकारलेले प्रतिरूप आहे. यामुळे तुझ्यासाठी प्रत्येक दिवसातील १२ तास माझे हे ओंगळवाणे रूप आणि १२ तास मी सुंदर तरुणीच्या रुपात राहीन. बघता-बघता तिचे एका सुंदर तरुणीमध्ये रुपांतर झाले. लॅन्सेलॉट पाहतच राहिला. इतकी सुंदर तरुणी त्याने याआधी कधीच पाहिली नव्हती.

'बोल, तुला या रुपात मला दिवसा पाहायला आवडेल की रात्री?' चेटकिणीने विचारले.

लॅन्सेलॉटची या प्रश्नावर काहीच मती चालेना. त्याला त्याच्या राज्यात हुशारी, हजरजबाबी आणि ज्ञानी म्हणून ओळखले जात होते. त्याने क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला, 'याचा निर्णय तुझा तूच घे. तू जो निर्णय घेशील तो मला मान्य असेल.'

या उत्तराने चेटकीण अत्यंत प्रसन्न झाली. लॅन्सेलॉटने निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला दिले आणि तिने पूर्ण वेळ सुंदर साजिजया रूपात राहणे पसंत केले.

या कथेचा खोल अर्थ लक्षात घेतला तर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य जेव्हा स्त्रीला असते, तेव्हा तिच्या व्यक्तिमत्त्वातील सौंदर्यवती आपोआप जागृत होते. ती स्वत:बरोबर आजूबाजूचा भोवताल सुंदर करून सोडते. पण तसे जर का झाले नाही, तर मात्र तिच्यातील चेटकीण जागी होते.

मित्रांनो,

स्त्रियांचा संघर्ष, त्यांचं जीवन, त्यांची क्रांती - विकास अनेक कसरतीच्या पायजयांनी भरलेला असतो. जिद्दीने, हरळीच्या चिवट वृत्तीने, कौशल्य-कलाकुसरीने त्यांना तो करावा लागेल. आज आपल्यासमोर अनेक आव्हानं आहेत. नैसर्गिक समस्यांसोबतच मानवनिर्मित समस्या आहेत. सध्या जगभराचे लक्ष असणाजया कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) लोक वेगवेगळ्या दृष्टीने विश्लेषण करत आहेत. त्याचे फायदे-तोटे-सोयी सांगत आहे. जमलंच तर भीतीही घालत आहेत. पण एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतातच. कुठलंही नवं तंत्रज्ञान येतं. तेव्हा ही चर्चा, भीती साहजिक आहे. जगात कितीही प्रगती झाली तरी तंत्रज्ञानाला काही मर्यादा असतात. तुमच्या-माझ्या जगण्याची भावनिक कविता एआय नाही लिहू शकणार. ती कवीलाच लिहावी लागेल. असो,

काही महत्त्वाचे निर्णय-

गेल्या अनेक वर्षांपासूनची मराठी भाषेला अभिजात भाषेच्या दर्जाची मागणी केंद्र शासनाने मान्य करून समृद्ध असणाजया मराठी भाषेचा गौरव केला आहे. त्यामुळे मराठी भाषक म्हणून केंद्र सरकारचे अभिनंदन व आभार व्यक्त करते.

त्याचप्रमाणे अहमदनगर या शहराचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्याबाई या कर्तबगार राणीच्या नावाने करून एका ऐतिहासिक प्रजाहितदक्ष स्त्रीचा सन्मान केला याबद्दलही मी आपल्या सर्वांच्या वतीने केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अभिनंदन करते. आभार व्यक्त करते. आणि सोबतच या निर्णयाच्या विरोधात कोर्टात याचिका दाखल करणाजया स्त्री सन्मानाच्या विरोधी भूमिका घेणाजया माजी कुलगुरु डॉ. निमसे यांचा जाहीर निषेध नोंदवते.

मित्रांनो,

आजच्या काळात लेखक कवींकडून सर्वांना अपेक्षा आहेत. लेखकानं आपल्या लेखकाच्या धर्माला जागून दीन-दुबळ्या, दु:खितांना, आपल्या शब्दांखाली झाकून घ्यावं, सर्वांना मायेची उब द्यावी. चांगल्या-वाईटाला आईच्या ममतेने निस्तरावं, सगळ्यांची माऊली व्हावं, त्यांच्या दु:खावर, फाटकेपणावर हळुवार फुंकर घालावी. वेळप्रसंगी त्यांच्यातल्या अवखळपणाला कान पकडून वठणीवर आणावं. साहित्य म्हणजे सत्याचा किंवा कशाचाही शेवट नसतो. लेखक म्हणून लेखकाला स्वत:ची राजकीय मतं असू शकतात. जरूर असावीत. पण साहित्याची भाषा म्हणजे पक्षीय राजकारणाची भाषा नसते. अलिकडे अनेक कवी-लेखक एखाद्या राजकीय पक्षाचा कार्यकर्ता वाटावा, अशी भाषा बोलताना दिसतात. जातीयवादाला खतपाणी घालताना, बोलताना, लिहिताना दिसतात. ज्यांनी समाजाला योग्य दिशा दाखवायची असते तेच असे दिशाहीन वागू लागले तर काय करावे? असो.

मागील १५ वर्षांपासून सातत्याने आणि गांभीर्यपूर्वक 'शब्दगंध' परिवार या संमेलनाचे आयोजन करत आहे. ही काही सोपी गोष्ट नाही. आयोजनात शेवटच्या क्षणापर्यंत येणाजया अनंत अडचणींचा सामना करत संमेलन पार पाडावे लागते. त्यातून येणाजया कडू-गोड अनुभवांतून कधी-कधी नैराश्य येण्याचीच दाट शक्यता असते. लेखक - कवी - कलावंत - कार्यकर्ते - मदतकर्ते सांभाळता - सांभाळता संयोजकांच्या नाकी नऊ येतात. त्यातूनही काही हिरवळीसारखे सुखावणारे चार-दोन क्षण, अनुभव, फोन, प्रतिक्रिया मनाला हुरूप देतात. पुन्हा उभं राहण्याची उमेद देतात. अशा या संमेलनातून अनेक नवे हात लिहू लागतात, त्याचाच आनंद अवर्णनीय असतो.

'कुणास्तव कुणीतरी अशी धडपड केल्याशिवाय नवनिर्माण होणार नाही.' या सुंदर विचारांचं भान जपत आयोजित केलेल्या या संमेलनाचे अध्यक्षपद देऊन मला मनातलं गुज बोलण्याची संधी दिल्याबद्दल संयोजक सुनील गोसावी आणि राजेंद्र उदागे व सर्व पदाधिकाजयांचे आभार व्यक्त करून कविवर्य ना. धों. महानोर यांच्या शेतकजयांच्या आबादानीचे पसायदान आपल्यासमोर ठेवून माझ्या बोलण्याला पूर्णविराम देते.

सूर्यनारायणा नित नेमाने उगवा
अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा
मोडक्या घराच्या बिंद्रावनाशी सांजेला
दिव्याचा आधार जडो त्यांच्या संसाराला
ओंजळीने भरू देगा पाखरांच्या चोची
दु:खात पंखांना मिळो सावली मायेची
आबादानी होवो शेत भरू दे दाण्याचे
तुझ्या पालखीला शब्द बांधू तुकोबाचे!

**धन्यवाद!**

# पवित्र रमजान कालावधीमध्ये उर्दू माध्यमाच्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्या - शेख अब्दुल रहीम

### शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** येत्या १ मार्च किंवा २ मार्च पासून मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. म्हणून उर्दू माध्यमाच्या सर्व शाळा (जिल्हा परिषद व खाजगी) या कालावधीमध्ये सकाळच्या सत्रात भरविणेबाबत एका निवेदन द्वारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण उपसंचालक श्री. प्रकाश मुकुंद साहेब, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती जयश्री चव्हाण मॅम यांना भेटून तसेच सविस्तर चर्चा करून हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी निवेदन सादर केले. उर्दू माध्यमाच्या शाळेतील सर्व विद्यार्थी-शिक्षक उपवास ठेवतात. पवित्र रमजान हे मार्च महिन्यात येत असल्याने यावर्षी उष्णता जास्त राहण्याची शक्यता नकारता येत नाही. या सर्व बाबीचा विचार करून विनंती करण्यात आली की उर्दू माध्यमाच्या सर्व शाळा या दरम्यान सकाळच्या सत्रात म्हणजेच सकाळी ७.३० ते १२.३०पर्यंत भरविण्यासाठी परवानगी देण्यात यावी. RTE Act २००९ नुसार दररोज ५ तासांचे अध्यापन अनिवार्य असल्याने शाळेच्या दैनंदिन शैक्षणिक कामकाजावर कोणताही परिणाम होणार नाही व शाळेतील रोजच्या तासिका नियमितपणे घेण्यात येतील या अटींवर सर्व व्यवस्थापनाच्या (जिल्हा परिषद व खाजगी) उर्दू माध्यमाच्या शाळांना सकाळच्या सत्रात शाळा भरविणेबाबत परवानगी देण्यात यावी अशी मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाची एक प्रत शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना ही देण्यात आली आहे.




### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे अनोखे आंदोलन

# झाडावर चढुन 'हनुमान' आंदोलन



**बदनापूर । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावी या मागणीसाठी बदनापूर तहसील कार्यालयासमोर शिवसेने (उद्धव ठाकरे) च्यावतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. एका शिवसैनिकाने हनुमानाच्या वेशभुषेत तहसिल कार्यालयसमोर झाडावर चढुन आंदोलन केले.

यामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना शब्द दिला होता की महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची सरसगट कर्जमाफी केली जाईल परंतु अद्याप पर्यंत कोणताच निर्णय घेण्यात आला नाही तेव्हा लाडक्या बहिणींना २१०० प्रति महिना अनुदान देऊ विज बिल माफ करू, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देऊ असे अनेक आश्वासन देऊन महायुती सरकार सत्तेत आले. परंतु निवडणूक काळात दिलेली आश्वासने सरकारने पाळले नाहीत. उलट बाजारामध्ये शेतकऱ्यांचे कापूस, तूर, सोयाबीन, गहू, ज्वारी, बाजरी, कवडीमोल भावाने विकल्या जात असून शेतकऱ्यांची आर्थिक लुटमार होत आहे. परिणामी शेतकरी आत्महत्याचे प्रमाण वाढले असून हा शेतकरी मेटाकुटीला चालला आहे. निवडणुकीपुर्वी दिलेली आश्वासने सरकारने पुर्ण करत संपूर्ण कर्जमाफीची घोषणा करावी अशी मागणी शिवसैनिकांनी केली आहे.

अन्यथा बदनापूर तालुका येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा ईशारा शिवसेनेच्यवातीने देण्यात आला आहे. यासंदर्भात दिलेल्या निवेदनावर माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, भगवानराव कदम, जिल्हा उपप्रमुख कारभारी म्हसलेकर, संजय जाधव, मिलिंद साळवे, काकासाहेब ढाकणे, भरत मदन, नितीन साळवे, ऋषिकेश थोरात, दत्ता जगताप, परमेश्वरचंद अंकुश पवार केशव श्री सागर, लक्ष्मण साळवे, संभाजी मदन, बळीराम कोल्हे, सुदाम काळे, सुभाष मदन, अमोल मदन आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धारधार तलवार बाळगणाऱ्या तरूणास इंदिरा नगर येथून घेतले ताब्यात

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** तलवार बाळगणाऱ्या तरुणाबाबत पोलिसांना गुप्तमाहिती मिळाली होती. त्यावरून शुक्रवार (दि ७)रोजी फैजान शेख नासेर (वय १८ वर्ष) रा. हनुमान मंदीरा जवळ, इंदिरा नगर जालना हा तो राहत असलेल्या ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी लोकांमध्ये दहशत निर्माण व्हावी. याकरिता हातात तलवार घेऊन फिरत आहे, अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सदर ईसमाचा शोध घेत असतांना तो त्याचे राहते घरी मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन २००० रु किंमतीची एक धारधार तलवार जप्त करण्यात आली असुन आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, रामप्रसाद पव्हरे, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास सर्व स्थागुशा यांनी केली आहे.

# धारदार चाकू बाळगणाऱ्यावर तालुका जालना पोलिसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** धारदार चाकू बाळगणाऱ्यावर तालुका जालना पोलिसांनी कारवाई केलीय. जालना शहरातील अंबड चौफुली भागात दिनांक ६ गुरुवार रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली आहे. बद्री लक्ष्मण तारे ( रा. पांगारकर नगर, अंबड रोड जालना) असे चाकू बाळगणाऱ्याचे नाव आहे. अंबड चौफुली भागात एक व्यक्ती स्वतः जवळ धारदार चाकू बाळगून असल्याची गुप्त माहिती तालुका जालना पोलिसांच्या पथकाला मिळाली होती. त्या माहितीवरून पोलिस पथकाने अंबड चौफुली भागात कारवाई करून चाकू बाळगणाऱ्यास पकडले आहे. या कारवाईत एक धारदार चाकू पोलिसांनी जप्त केला असून अधिक तपास सुरू आहे.

# मुख्याध्यापकावरील कारवाई म्हणजे 'दुखणं म्हशीला अन् इंजेक्शन पखालीला' प्रमाणे

### बडतर्फी, निलंबनऐवजी फक्त मुख्याध्यापक पद काढून शिक्षक म्हणून रुजू करून घेतल्याने पालकात संताप

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्याला अमानुष मारहाण करणाऱ्या शहागड (ता. अंबड) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. खेडकर यांना यांच्यावर बडतर्फी अथवा निलंबनाची करण्याऐवजी केवळ पदावरून हटवून पुन्हा शिक्षक म्हणून त्या शाळेवर रुजू करण्यात आल्याने पालकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. ही कारवाई म्हणजे एक प्रकारचे थट्टा असून, मुख्याध्यापक पद काढून घेतले असलेतरी त्यांच्यातील प्रवृत्ती कायम असल्याने कठोर कारवाई करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते मोबीन बागवान आणि भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे शहर उपाध्यक्ष शोहेब सय्यद यांनी दिला आहे.

यासंदर्भात शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहागड येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक श्री. खेडकर यांनी सातवीच्या एका विद्यार्थ्याला निर्दयपणे मारहाण केली होती. चुकून नववीच्या वर्गात बसल्याने खेडकर यांनी त्याला केसांनी ओढत मारहाण केली. या घटनेमुळे विद्यार्थी केवळ शारीरिकदृष्ट्या जखमी झाला नाही, तर त्याच्या मानसिक स्वास्थ्यावरही परिणाम झाला. या घटनेनंतर संतप्त पालकांनी पोलिसांत तक्रार दिली होती. तसेच शिक्षण विभागाकडे खेडकर यांच्यावर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेही चौकशीचे आदेश दिले. मात्र, ही चौकशी केवळ दिखावा ठरली, कारण खेडकर यांना बडतर्फ करण्याऐवजी त्यांना केवळ मुख्याध्यापक पदावरून हटवण्यात आले आणि पुन्हा शिक्षक म्हणून रुजू करून घेण्यात आले.

यामुळे पालक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. विद्यार्थ्यांस अमानुष मारहाण करणाऱ्या शिक्षकाला पुन्हा विद्यार्थ्यांच्या संपर्कात येण्याची संधी देणे हा शिक्षण व्यवस्थेचा अपमान आहे. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही, असे सामाजिक कार्यकर्ते मोबीन बागवान आणि भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे शहर उपाध्यक्ष शोहेब सय्यद यांनी स्पष्ट केले. या संपूर्ण प्रकरणात शिक्षण प्रशासनाने कोणती भूमिका घेतली, चौकशीचे नेमके निष्कर्ष काय होते आणि आरोपी शिक्षकाला पुन्हा नेमणूक का देण्यात आली, याबाबत अजूनही उत्तर मिळू शकलेले नाही. मात्र, पालक आणि स्थानिकांचा विरोध लक्षात घेता, शिक्षण विभागाला या प्रकरणात तातडीने निर्णय घ्यावा लागणार आहे.

खेडकर यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले नाही, तर शाळेच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले जाईल, शाळा बंद पाडली जाईल आणि शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली जातील, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.



बदनापूर तालुक्यातील हलदोला येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### समर्थ इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

# बाल गोपाळांच्या सादरीकरणाने जिंकली उपस्थितांची मने !




**सुखापुरी । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील सुखापुरी येथील समर्थ इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन गुरूवारी (०७) रोजी उत्साहात पार पडले. सुखापुरी येथील रंभादेवी मंदिराच्या प्रांगणात स्नेह संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सुखापुरी ग्रामपंचायतचे सरपंच भगवान राखुंडे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य व परिसरातील पत्रकार विशेष अतिथी म्हणून या कार्यक्रमास उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर प्रवीण राठोड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.तर मान्यवर पाहुण्यांनी स्वागतपर भाषण करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यानंतर बाल गोपाळांनी नृत्य, नाट्य, गायनाच्या माध्यमातून आपले कलागुण सादर केले. यावेळी उपस्थित शिक्षक वृंद व पालकांनी बाल गोपाळांच्या कलागुणांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे अध्यक्ष दत्तात्रय राखुंडे यांनी केले.

# मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पुन्हा आंदोलन पुकारणार!

### उपोषणस्थळी पुन्हा मंडप टाकण्याचे काम सुरु



**जालना । प्रतिनिधी -** यापुढे कधीही उपोषण करणार नाही, मराठा आरक्षणासाठी आता रस्त्यावर समोरा समोर लढाई करणार असं सांगत आमरण उपोषण स्थगित केलेले मनोज जरांगे पुन्हा आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याची खात्रीलायक माहिती शुक्रवार (दि ७) रोजी दुपारी समोर आली आहे. जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे सात वेळा आमरण उपोषण केले. जरांगे यांचे सातवे उपोषण भाजप आमदार सुरेश धस यांच्या मध्यस्थीने स्थगित करण्यात आले. हे उपोषण स्थगित करतांना जरांगे यांच्या मागण्या राज्य सरकार पूर्ण करणार असल्याच पत्र देखील त्यांना सोपवण्यात आले. मात्र सरकारकडून मागण्यांच्या अंमलबजावणी बाबत कोणतीही हालचाल होत नसल्याने जरांगे अंतरवालीत पुन्हा राज्यव्यापी आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत. या आंदोलनाची तयारी म्हणून जरांगे यांच्या नेहमीच्या उपोषणाच्या ठिकाणी गावकऱ्यांनी अचानक पुन्हा मंडप उभारणीचे काम सुरू केलेले आहे. दरम्यान अंतरवालीत जरांगे पुन्हा आमरण किंवा साखळी उपोषण करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळते आहे. आता या आंदोलनाबाबत जरांगे काय भूमिका मांडतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. जरांगे हे शनिवार (दि ९) रोजी पत्रकार परिषद घेऊन या आंदोलनाबाबत घोषणा करण्याची शक्यता आहे.



वरळी येथील त्यागमुर्ती रमाई माता प्रेरणास्थळ येथे माता रमाई यांच्या १२७व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार सचिन अहिर, पत्रकार दत्ता खंदारे, जेष्ठ पत्रकार व थोर समाजसेवक शशिकांत सावंत, प्रसिद्ध गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर आणि साहित्यिक व कवी विलास देवळेकर उपस्थित होते.

### आरोपीला नोटीस देऊन सोडले !

# सहाय्यक पोलीस निरीक्षकासह दोन पोलीस शिपाई तडकाफडकी निलंबित

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन गेलेल्या आरोपीला नोटीस देऊन सोडल्यानं सहायक पोलीस निरीक्षकासह दोन पोलीस शिपाई यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. राहुल जाधव सहायक पोलिस निरीक्षकाचं नाव आहेत तर देविदास जाधव आणि नरेंद्र जाधव अशी पोलीस कर्मचार्यांची नावं आहेत. काही दिवसांपूर्वी वाटुर फाटा येथे प्रल्हाद शेषनारायण भगस याने अंगावर पेट्रोल टाकून जाळून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर कारणीभूत असलेल्या आरोपी किशोर अग्रवाल याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिस निरीक्षकांनी आरोपीला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी सहायक पोलीस निरीक्षक राहुल जाधव यांच्या ताब्यात दिला असता त्यांनी नोटीस देऊन आरोपीला सोडून दिले.. याची माहिती पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना कळताच त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक राहुल जाधवसह दोन पोलीस कर्मचार्यांना तडकाफडकी निलंबित केलं. दरम्यान या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.